P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – ०२/०७/२०२४**

## पिंपरी चिंचवड पोलीसांची संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पवार टोळी, जाधव टोळी, या टोळयांवर "मोका अंतर्गत कारवाई"

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री. विनय कुमार चौबे यांनी गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे, मालाविरुध्दचे गुन्हे करणारे, विनयभंग करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील १८ संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण ९८ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) पिंपरी पोलीस स्टेशन गुरनं ३८७/२०२४ भादंवि. कलम ३०२, १४३, १४७, १४९** या गुन्हयांचे तपासामध्ये आरोपी नामे **१) अविनाश राकेश पवार (टोळी प्रमुख)** वय २८ वर्षे, रा. घर नं. क्यु/३१, शेलार गल्ली, दत्तनगर, चिंचवड पुणे **२) संतोष उत्तम चौगुले,** वय ३० वर्षे, रा. पोखरकर दवाखान्याजवळ, दत्तनगर, चिंचवड पुणे **३) ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली राजेंद्र पाटील,** वय २७ वर्षे, रा. बौध्द विहाराचे जवळ, दत्तनगर, चिंचवड पुणे **४) रंजना उत्तम चौगुले,** वय ५२ वर्षे, रा. गायवासरू चौक, मोहनगनर, चिंचवड पुणे **५) यश बाबू गरुड,** वय १८ वर्षे, रा. दत्त मंदीरासमोर, दत्तनगर, चिंचवड पुणे **६) निसार मोहम्मद शेख,** वय २५ वर्षे, रा. बौध्द विहाराचे जवळ, दत्तनगर, चिंचवड पुणे **७) रेणुका मारुती पवार,** वय ३६ वर्षे, रा. भगत किराणा दुकानाजवळ, दत्तनगर, चिंचवड पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ११ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**२) निगडी पोलीस स्टेशन गुरनं २४१/२०२४ भादंवि कलम ३०७, ३४, आर्म ॲक्ट ४, २५, महा.पो.का. कलम ३७(१)(३), १३५, १४२** या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) जितेंद्र आनंदा जाधव (टोळी प्रमुख)** वय-२३ रा. पत्राशेड, चिकनचौक, ओटास्किम, निगडी, पुणे. **२) आकाश उर्फ बबुल दत्ता मोरे,** वय-१९ वर्षे रा. घर नं. जे/११/१६, बौद्धनगर, काळभोरगोठा, ओटास्किम, निगडी, पुणे. **३) अमन समिर शेख,** रा. गुरुदत्त हौ.सोसा. बि.नं. एफ/२, ओटास्किम, निगडी, पुणे, **४) विधीसंघर्षीत बालक** रा.नुरूला मस्जिद समोर १/१६, सेक्टर नं.२२, ओटास्किम, निगडी, पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०७ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

वरील दोन्ही **टोळी प्रमुख** यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **पिंपरी, वाकड, चिखली, निगडी, रांजणगांव** पोलीस स्टेशन हद्दीत **खुन, घातक हत्यारे जवळ बाळगुन दहशत निर्माण**

**करुन खुनाचा प्रयत्न करणे,दरोड, दरोडयाची तयारी, गंभीर दुखापत, दुखापत, कट रचणे, तोडफोड करणे, विनयभंग करणे, बेकायदेशिर अग्निशस्त्रे व हत्यार जवळ बाळगणे,** अशा प्रकारेचे गंभीरे स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन टोळी प्रमुखाने गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.संदिप डोईफोडे (गुन्हे), मा.पोलीस उप-आयुक्त स्वप्ना गोरे मॅडम (परि-०१), मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.विशाल हिरे (गुन्हे), मा.सहा.पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर (गुन्हे -१), यांच्या मार्गदशनाखाली वपोनि श्री. अशोक कडलक (पिंपरी पोस्टे) वपोनि श्री.शत्रुघ्न माळी (निगडी पोस्टे) पोलीस निरीक्षक श्री.अनिल देवडे (पी.सी.बी गुन्हे शाखा), पोहवा सोनटक्के (निगडी पोस्टे), पोना ओंकार बंड, पोशि कौटेकर (पिंपरी पोस्टे), पोहवा सचिन चव्हाण, पोहवा व्यंकप्पा कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, यांच्या पथकाने केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पिंपरी चिंचवड आयुक्तालय